**MHJN090006592025**

नि.दि.दावा क्र.८१/२०२५

मोहम्मद इसाक वि. मोहम्मद हाशम

## <u>नि.क्र.२६ वरील आदेश.</u>

प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रकरणामध्ये लेखी जबाब दाखल करण्याची परवाणगी मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, त्यांना दाव्याचे समन्स व अर्जाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ते न्यायालयात हजर झाले व लेखी जबाब दाखल करण्यास वेळ मिळणेबाबत विनंती केली. त्यानंतर न्यायालयाने त्यांना लेखी जबाब दाखल करण्याकरीता वेळ दिली. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना लेखी से व जबाब दाखल करण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. परंतु काही महत्वाची कागदपत्रे मुदतीमध्ये मिळाली नाही त्यामुळे वेळेत प्रतिवादी यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करता आला नाही. सदर विलंब हा जाणुन बुजुन केलेला नाही. तसेच दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी याचे लेखी म्हणणे रेकॉर्डवर घेउन त्यांना सदर दाव्यामध्ये त्यांची बाजु मांडण्याची संधी न मिळाल्यास त्यांचे खूप मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब, लेखी जबाब दाखल करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

३. वादीच्या विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.४ व ५ यांना नोटीस तामील होवुनही त्यांनी वेळेत लेखी जबाब दाखल केला नाही. करीता त्यांचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विव्दान वकिलांना ऐकले.

५. प्रस्तुत प्रतिवादी हे दाव्याकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी न्यायाच्या दृष्टीकोनातून देणे आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करण्याकरिता केलेला विलंबाकरिता रक्कम रुपये ३००/– इतका आर्थिक दंड करणे योग्य होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज प्रत्येकी रक्कम रुपये ३००/– च्या खर्चावर मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ४ व ५ ने सदरचा खर्च वादी यांना पुढील नेमलेल्या तारखेस किंवा त्यापुर्वी देणेचा आहे.

स्वा /–

दि.१६.०३.२०२६

(श्री. जी.एन.लंघे )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.